स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :- २ मार्च, २०२३

जळगाव दि.२ (प्रतिनिधी) विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग विचारांमध्ये प्रगल्भता आणणेसाठी करावा. तसेच उत्तम नागरिक होऊन सामाजिक, नैतिक व तत्ववादी मूल्यांचा वापर करुन समाजातील सर्व घटकांविषयी संवेदनशील बनले पाहिजे असे प्रतिपादन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार सेवा विभाग व मुंबई येथील मावा संस्था ( मेन अगेंस्ट व्हॉयलेन्स अॅण्ड अॅब्युज) यांच्या संयुक्त विद्यमाने लिंगसमभाव संवेदनशीलता या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. मंचावर मावा संस्थेचे प्रतिनिधी प्रवीण थोटे, अमोल काळे आणि संचालक प्रा.आशुतोष पाटील हे होते. कुलगुरु प्रा. माहेश्वरी म्हणाले की, शिक्षण मिळवण्याचा उद्देश चांगली नोकरी किंवा व्यवसायापुरता न ठेवता आपल्या मेंदूला विचार करणे, विश्लेषण व संवेदनशील बनण्यासाठी उपयोगात आणावे. मूल्य शिक्षण आत्मसात करुन समाजातील स्त्री, पुरुष, पारलिंगी घटकांप्रती समानतेची वागणूक द्यावी. या कार्यशाळेतून प्राप्त झालेले ज्ञान विद्यार्थ्यांनी समाजापर्यंत पोहचवावे.

मावा संस्थेतर्फे प्रवीण थोटे यांनी संस्थेच्या कार्याविषयी माहिती देऊन लिंगसमभाव विषयाबाबत जागरुकता आणणे गरजेचे असल्याने विविध महाविद्यालयांमध्ये जाऊन याविषयीच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात असे सांगितले. प्रास्ताविक करतांना प्रा.आशुतोष पाटील यांनी जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी स्त्री, पुरुष व पारलिंगी यांच्याबाबत आदरपुर्वक व्यवहार ठेवणे आवश्यक असल्याचे सांगून आजच्या कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना उपयुक्त ज्ञान प्राप्त होईल असे सांगितले. सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले.

उद्घाटनानंतर पहिल्या सत्रात प्रवीण थोटे यांनी लिंग(सेक्स) आणि लिंगभाव (जेंडर) या दोन संकल्पनांमधील भेद समजावून सांगितला. पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून चर्चा करतांना रोजच्या जीवनातील लहान लहान उदाहरणे त्यांनी दिली आणि लिंगभाव घडवण्याची प्रक्रिया उलगडून दाखविली. दुपारच्या सत्रात लिंगभाव प्रस्थापित करणा-या घटकांचे स्वरुप अमोल काळे यांनी विविध उपक्रमांमधून मांडले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी